# Washim District Police

**Nature of Work** :- **Raid on Gutkha**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **14/06/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. कारंजा शहर हद्दीतील काझीपुरा येथे प्रतिबंधित गुटख्यावर पोलीस पथकाची धाड ; 01.60 लाखांचा मुद्देमाल जप्त.

## दीड लाखाचा गुटखा जप्त

**कारंजा,** (वा.). अवैधपणे घरात साठवलेला दीड लाखापेक्षा अधिक किमतीचा गुटखा जप्त करण्यात शहर पोलिसांना यश आले आहे. ही कारवाई 13 जून रोजी करण्यात आली आहे.



शहरातील काजीपुरा भागात प्रतिबंधित गुटख्याची अवैधपणे साठवणूक व विक्री केली जात असल्याच्या माहिती, शहर पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे सोमवारी पोलिसांनी जिकरान खान कलीम खान (32) याच्या घरी धाड टाकून त्याच्या घरातून 1 लाख 60 हजार 350 रुपयांचा गुटखा पंचासमक्ष जप्त केला. तसेच त्यास अटक करून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक बच्चन सिंह, उपविभागीय पोलिस अधिकारी जगदीश पांडे यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार आधारासिंग सोनोने, सहायक पोलिस निरीक्षक प्रशांत जाधव, पोहेका चरण चव्हाण, पोलिस नाईक अनिल राठोड, पोका फिरोज खान, रोहन तायडे आदी सहभागी झाले होते.

## हॉटेल, धाब्यावर दारूविक्री, दोघांवर गुन्हा

**अकोला.** राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल्स व धाब्यांवर अवैध दारु विक्री होत असल्याच्या माहितीवरुन पोलिसांनी कारवाई करीत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पोलिस अधीक्षक जी. श्रीधर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकास मिळालेल्या गुप्त छापेमारीत मूर्तिजापूर-माना रोडवरील सतनाम ढाब्यावर देशी दारूची अवैध विक्री करताना मालक सतनामसिंग गील आढळला. त्याच्याजवळ 45 नग देशी दारू (किंमत दोन हजार रुपये) बाटल्या सापडल्या. तसेच अन्य एका कारवाईत वृंदावननगर, मायक्रो टॉवरजवळ कैलास राठोड याच्याकडे देशी दारूच्या 40 बाटल्या आढळल्या.